महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) वर्ष : तिसरे अंक : १७ वे दिनांक : ०५/०१/२०२६ वार : सोमवार

## शरद पवारांच्या नादी लागणे म्हणजे दाऊदच्या नादी लागणे : प्रकाश आंबेडकर



**परभणी** : महापालिकेच्या निवडणुकीच्या अनुषंगाने सर्वच पक्षांनी जोरदार प्रचार सुरू केला आहे. वंचित बहुजन आघाडीचे सर्वेसर्वा प्रकाश आंबेडकर यांनी देखील प्रचाराचा शुभारंभ केला आहे. परभणी महानगरपालिकेच्या निवडणुकीच्या प्रचारार्थ आंबेडकरांची आज सभा पार पडली. या सभेत बोलताना कॉंग्रेसवर सडकून टीका केली आहे. इतके दिवस तुम्ही शरद पवारांच्या नादी लागलात, म्हणजे दाऊद इब्राहीमच्या नादी लागलात. म्हणून तुमची अशी अवस्था झाली, असे म्हणत आंबेडकरांनी टीका केली आहे.

सभेत बोलताना प्रकाश आंबेडकर म्हणाले, कॉंग्रेसकडे आता मतदार उरला नाही. केवळ मुस्लिम मतदार त्यांच्याकडे राहिला आहे. तुम्ही इतके दिवस शरद पवारांच्या नादी लागलात म्हणजे दाऊद इब्राहीमच्या नादी लागलात. म्हणून तुमची अशी अवस्था झाली आहे. बाबाजाणी यांनी खतीब यांचा उपयोग करून घेतला आणि आता ते कॉंग्रेसचीच वाट लावायला निघालेत, अशी टीका त्यांनी कॉंग्रेसचे बाबाजाणी दुर्राणी यांच्यावर केली आहे.

पुढे बोलताना प्रकाश आंबेडकर म्हणाले, इथल्या मुस्लिमांना आवाहन आहे, कॉंग्रेसकडे आता काही राहिले नाही, फक्त मुस्लिम मतदार उरला आहे. कॉंग्रेस शरद पवारांच्या नादी लागल्याने असे झाले आहे. शरद पवार म्हणजे दाऊद इब्राहीमच आहेत. आता कॉंग्रेसकडे मतदार नाही, तेव्हा उद्याच्या व्यवस्थेमध्ये संविधान टिकले पाहिजे असे वाटत असेल तर मुस्लिमांनी वंचितच्या उमेदवाराला मतदान केले पाहिजे.

परभणी येथील सभा पार पडल्यानंतर प्रकाश आंबेडकर यांना बिनविरोध नगरसेवक निवडून येत असल्याच्या प्रकरणावर प्रश्न विचारण्यात आला. यावर आंबेडकर म्हणाले, हुकुमशाहीला सुरुवात झाली आहे. आमदारांनी उमेदवारांना दमदाटी करून पळवले आहे. काही ठिकाणी विकत घेतले आहेत. अर्ज माघारी घेण्याची सिस्टिम आता बंद केली पाहिजे अशी मागणी आम्ही करणार आहोत. तरच लोकशाही टिकेल असे आम्ही मानतो.

महायुतीतील पक्ष काही ठिकाणी वेगळे लढत आहेत, यावर बोलताना प्रकाश आंबेडकर म्हणाले, भाजपला येथील राजकीय पक्ष संपवायचे आहेत. इलेक्शन निमित्ताने आपल्याला यांना संपवता येईल असे त्यांना वाटत आहे. म्हणून त्यांनी युती केली नाही. सत्ता आली नाही की पक्ष संपतात अशी परिस्थिती आहे. सगळीकडे अजित पवार युतीतून वेगळे लढत आहेत. मुस्लिमांचे विभाजन करण्याचे ते बघत असल्याचे मत आंबेडकरांनी दिले आहे.

## अंबादास दानवेंचा घाटी अधिष्ठाता डॉ. सुक्रेवर गंभीर आरोप



**छत्रपती संभाजीनगर** : शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते अंबादास दानवे यांनी छत्रपती संभाजीनगर येथील घाटी रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत. डॉ. सुक्रे उमेदवारांना धमकावत असल्याचा दावा करत दानवे यांनी निवडणूक आयोगाकडे त्यांच्या निलंबनाची मागणी केली आहे.

गेल्या दोन दिवसांपासून दानवे राजकीय आखाड्यात अधिकाऱ्यांकडून उमेदवारांना धमक्या दिल्या जात असल्याचा आरोप करत होते. यावर पालकमंत्री संजय शिरसाट यांनी त्यांना संबंधित व्यक्तींची नावे जाहीर करण्याचे आव्हान दिले होते. या आव्हानाला उत्तर देताना दानवे यांनी थेट डॉ. शिवाजी सुक्रे यांचे नाव घेतले. डॉक्टरांच्या वेशभूषेत राजकीय सौदेबाजी करत असल्याचा आणि उमेदवारांना फोन करत असल्याचा आरोप त्यांनी केला.

दानवे यांनी निवडणूक आयोगाला पाठवलेल्या पत्रात म्हटले आहे की, डॉ. सुक्रे यांनी छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका निवडणूक लढवणाऱ्या शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या उमेदवाराला फोन करून 'कशाला पालकमंत्र्यांच्या नादी लागतोस, उमेदवारी मागे घेऊन टाक' असे म्हटले आहे. ही बाब निवडणूक आचारसंहितेचे गंभीर उल्लंघन असल्याचे दानवे यांनी नमूद केले.

पत्रात पुढे असेही म्हटले आहे की, डॉ. शिवाजी सुक्रे यांची अधिष्ठाता पदावरील नियुक्ती केवळ 22 जून 2024 पर्यंतच वैध होती, तरीही ते अजूनही पदावर कायम आहेत. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाने (MAT) देखील त्यांच्या या 'बेकायदेशीर नियुक्ती'ची दखल घेतली होती. पालकमंत्री संजय शिरसाट यांची बाजू घेऊन डॉ. सुक्रे पदावर कायम राहिल्याची परतफेड करत असल्याचा आरोप दानवे यांनी केला आहे.

## ठाकरेंचा महापौर झाला, तर मुंबई पाकिस्तान होईल - अमित साटम



**मुंबई** : महानगरपालिकेमध्ये १९९७ ते २०२२ या २५ वर्षांच्या कालावधीत उद्धव ठाकरेंनी देशातील सर्वात मोठा भ्रष्टाचार केला असल्याचा खळबळजनक आरोप भाजप मुंबई अध्यक्ष अमित साटम यांनी केला आहे. देशात आजवर झालेले २जी, कोल स्कॅम किंवा कॉमनवेल्थ यांसारख्या मोठ्या घोटाळ्यांचा आकडा १ लाख ७६ हजार कोटींच्या वर गेला नाही, मात्र ठाकरेंनी एकट्या मुंबई पालिकेत ३ लाख कोटी रुपयांचा भ्रष्टाचार केल्याचा दावा अमित साटम यांनी केला आहे. तसेच महापौर ठाकरेंचा झाला, तर मुंबई पाकिस्तान होईल, असा दावा अमित साटम यांनी केला.

उद्धव ठाकरेंच्या भ्रष्ट कारभारामुळे मुंबई महापालिकेची दयनीय अवस्था झाल्याचे सांगत अमित साटम यांनी एका कवितेद्वारे आपल्या भावना व्यक्त केल्या.

*महापालिका रडते आहे, किंचाळत ओरडते आहे. ढासळून ती पडता पडता, तुझ्याकडे ती पाहत आहे लचके तोडून दशको दशकी, घायाळ तिला ज्यांनी केले त्या पापांचा हिशोब आता जगाकडे ती मागत आहे. तू दिलेस ज्यांना निवडून त्यांनी या नगरीला काय दिले? भरून पोतड्या, बंगले बांधून नगरीला या नागविले*

या कवितेच्या माध्यमातून त्यांनी मुंबईला लुटणाऱ्यांचा हिशोब जनताच घेईल, असा इशारा दिला आहे.

मुंबई शहर आणि महानगरपालिकेच्या दृष्टीकोनातून सगळ्या मोठा मुद्दा म्हणजे रस्त्याचा आहे. मुंबई शहर आपल्या रस्त्यांसाठी संपूर्ण जगभरात कुप्रसिद्ध आहे. शहरातील रस्ते कसे आहेत, यावरून आपण संबंधित शहराबद्दल मत व्यक्त करत असतो. परंतु, मुंबई शहराच्या रस्त्यात खड्डे की खड्ड्यात रस्ते, ही चर्चा गेली अनेक वर्षांपासून ऐकत आहोत, असे साटम म्हणालेत.

मुंबईतील रस्त्यांच्या दुरवस्थेवर बोट ठेवताना साटम यांनी माहिती अधिकारातून (RTI) मिळालेल्या माहितीचा दाखला दिला. त्यांनी सांगितले की, केवळ गेल्या १० वर्षांत मुंबईतील रस्त्यांवर महानगरपालिकेने २१ हजार कोटी रुपये खर्च केले आहेत. एवढा मोठा निधी खर्च होऊनही मुंबईतील रस्त्यांची अवस्था दयनीय असून, रस्त्यात खड्डे आहेत की खड्ड्यात रस्ते, हेच समजत नाही. या सर्व परिस्थितीला केवळ आणि केवळ उद्धव ठाकरे जबाबदार असल्याचा थेट आरोप त्यांनी यावेळी केला.

अमित साटम यांनी ठाकरेंच्या कार्यकाळातील विविध घोटाळ्यांचा पाढाच वाचला. यामध्ये खालील प्रकरणांचा समावेश असल्याचे त्यांनी सांगितले. १ लाख ४६ कोटींचा मोठा स्कॅम, शिक्षण घोटाळा, पाणी प्रकल्प रद्द करून केलेला घोटाळा, कचऱ्याचा घोटाळा आणि जाहिरात उत्पन्नातील भ्रष्टाचार. मुंबईतील १७०० बार आणि रेस्टॉरंटमधून वसुली करण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला.

महालक्ष्मी कोविड सेंटर बिल्डरच्या फायद्यासाठी उभारले गेले, तसेच बॉडी बॅग आणि पीपीई किट खरेदीमध्येही मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार झाला. पाकिस्तानच्या पत्रकार फहद हुसेनने ट्विट करून महाराष्ट्रातील कोविड स्थिती पाकिस्तानपेक्षा वाईट असल्याचे म्हटले होते. महापालिकेची स्टॅंडिंग कमिटी उद्धव ठाकरेंचीच माणसे 'रिमोट कंट्रोल'ने चालवत असत, असा दावा अमित साटम यांनी केला.

अमित साटम यांनी अत्यंत टोकाची टीका करत म्हटले की, जर उद्धव ठाकरेंचा महापौर झाला तर मुंबईचे 'पाकिस्तान' होईल. "ठाकरेंनी २५ वर्षात मराठी माणसासाठी केलेले एक तरी काम दाखवावे, आम्ही १० कामे दाखवू," असे आव्हान त्यांनी दिले. आम्ही बीडीडी चाळीत घरे दिली, तर ठाकरेंनी स्वतःसाठी 'मातोश्री २' बांधली, असा टोला त्यांनी लगावला. तसेच, ठाकरे आता मराठी माणसाचे राहिले नसून ते रशीद मामू, चंगद मुलतानी आणि हारून खान यांचे झाले आहेत, असा गंभीर आरोपही त्यांनी केला.

येणाऱ्या निवडणुकीत महायुतीचाच महापौर होईल आणि मुंबईवर भगवा फडकेल, असा विश्वास साटम यांनी व्यक्त केला. विरोधकांच्या बिनविरोध निवडणुकीच्या प्रश्नावर त्यांनी विचारले की, त्यांनी निवडणूक का लढवली नाही?. उद्धव ठाकरेंनी दिलेल्या शिव्या या आपल्याला नसून मराठी माणसाला आहेत, असे उत्तरही त्यांनी यावेळी दिले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार ५ जानेवारी २०२६

## मोतीमाता यात्रेनिमित्त वडनेर येथे भव्य टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेचे आयोजन



**कन्नड (अरुण थोरात) :** मोती माता यात्रे निमित्त वडनेर ता.कन्नड येथे ईश्वरसिंह क्रिकेट क्लब यांच्या वतीने भव्य टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. शासकीय आश्रम शाळा वडनेर येथील मैदानावर ही स्पर्धा होत आहे. या स्पर्धेचे उदघाटन भावी जिल्हा परिषद सदस्य यशोदाबाई लक्ष्मण पवार (वडनेर) यांचे प्रतिनिधी सोनू पवार यांच्या शुभहस्ते पार पडले. उद्घाटन प्रसंगी वडनेर चे सरपंच मूलचंद भाऊ पवार, ईश्वर सिंह क्रिकेट क्लबचे कप्तान गोकुळ राठोड, ग्रामपंचायत सदस्य चांद शहा, वडनेर आश्रम शाळेचे मुख्याध्यापक किशोर वारे, संतोष राठोड, संतोष गांगुर्डे, अन्वर शहा तसेच क्रिकेट स्पर्धा आयोजक समितीचे सदस्य आदी मान्यवर उपस्थित होते.या स्पर्धेतील उद्घाटनप्रसंगी रीठी मोहर्डा आणि चापानेर या दोन्ही संघांमध्ये रंगतदार सामना पार पडला. या सामन्यामुळे संपूर्ण परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.यावेळी उपस्थित मान्यवरांनी आपल्या मनोगतात सांगितले की, गेल्या अनेक वर्षांपासून वडनेर या नगरीला क्रिकेटची समृद्ध परंपरा लाभलेली आहे, मात्र धावपळीच्या जीवनशैलीमुळे व इतर कामांमध्ये नागरिक युवक व्यस्त राहिल्याने ही परंपरा काही काळ खंडित झाली होती. परंतु या भव्य टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेच्या माध्यमातून वडनेरची क्रिकेट परंपरा पुन्हा एकदा सुरू होऊन ती भविष्यातही कायम सुरू राहावी, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.या स्पर्धेचा आनंद घेण्यासाठी तालुका, पंचक्रोशीतील क्रिकेटप्रेमी युवक, तरुण तसेच ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## स्वत:वर विश्वास ठेवा, महान गोष्टी साध्य करा - इश्तियाक अहमद








**जळगाव :** उर्दू कबीला संस्थेतर्फे जळगाव येथील मोतीवाला हॉलमध्ये एस.एस.सी.च्या विद्यार्थ्यांसाठी एका मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात इकरा पब्लिक स्कूलचे विज्ञान व गणित विषय तज्ञ इश्तियाक अहमद आणि मोहसीन खान यांनी मार्गदर्शक म्हणून काम पाहिले.या शिबिराचा उद्देश विद्यार्थ्यांना त्यांच्या आगामी एसएससी परीक्षेच्या तयारीसाठी मदत करणे हा होता. इश्तियाक अहमद आणि मोहसीन खान यांनी विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन केले आणि विविध विज्ञान व गणित विषयांवर मार्गदर्शन केले,तसेच परीक्षेच्या तयारीसाठी मौल्यवान टिप्स आणि युक्त्या सांगितल्या.हे सत्र संवादात्मक होते, ज्यात विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेतला आणि प्रश्न विचारले.उर्दू कबीलाचे आयोजक मुश्ताक करीमी व इकरा शिक्षण संस्था अध्यक्ष डॉ.करीम सालार यांनी मोहसीन खान व इश्तियाक अहमद यांचे विशेष सत्कार केले. हे मार्गदर्शन शिबिर खूप यशस्वी ठरले, ज्यामुळे अनेक विद्यार्थ्यांना फायदा झाला आणि एसएससी परीक्षेसाठी त्यांचा आत्मविश्वास वाढला.

## "स्वतंत्र, निर्णयक्षम , बाणेदार स्त्री निर्माण होणे हीच सावित्रीबाईंना आदरांजली"- डॉ. सविता वावगे



**छत्रपती संभाजीनगर :** स्वत:च्या बुद्धिचा वापर करून स्वतंत्र निर्णयक्षम स्त्री निर्माण होणे हीच खरी क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांना आदरांजली." असे प्रतिपादन डॉ. वावगे यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर कला व वाणिज्य महाविद्यालयात जयंती निमित्त केले. आजीवन शिक्षण विस्तार विभाग आयोजित सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त मुक्तानंद महाविद्यालय, गंगापूर येथील प्रा.डॉ. सविता वावगे यांनी क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जीवन कार्याविषयी माहिती देत आजच्या स्त्री पुढील आव्हाने स्पष्ट करत सामाजिक ,राजकीय, कौटुंबिक, सांस्कृतिक जीवनात तिला स्वतंत्र निर्णय घेण्याचे व ते समजून घेण्याची पुरूषी मानसिकता, तिचे व्यक्ती म्हणून स्वतंत्र स्थान व अस्तित्व स्वीकारले पाहिजे याची जाणीव करून दिली.यावेळी प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय उपप्राचार्य प्रा.एन.एम. करडे यांनी करून दिला.तर अध्यक्षीय समारोप प्राचार्य डॉ. आर.व्ही. मस्के यांनी सामाजिक व राजकीय जीवनात स्त्रीला दुय्यम समजणाऱ्या पुरूषसत्ताक व्यवस्थेला आव्हान देणाऱ्या समाजसुधारकांचा गौरव करत सावित्रीबाई फुले या त्याच्या अग्रणी असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. नवनाथ गोरे यांनी तर आभार डॉ.ज्योती केदारे यांनी केले. कार्यक्रमास विद्यार्थी, कर्मचारी व प्राध्यापकवृंद उपस्थित होते.



# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार ५ जानेवारी २०२६

## जिल्हा परिषद प्रशाला बहिरगाव येथे 'पाड्यावरचा चहा' ने दिला अध्ययन अनुभव



**कन्नड प्रतिनीधी** : महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तकातील इयत्ता ८ वीच्या मराठी विषयातील "पाड्यावरचा चहा" हा धडा वारली आदिवासी समाजाची साधी जीवनशैली, संस्कृती व राहणीमान प्रभावीपणे मांडणारा आहे. या धड्याच्या अध्ययनाला अधिक जिवंत व अनुभवाधारित स्वरूप देण्यासाठी जिल्हा परिषद प्रशाला बहिरगाव येथे दशसूत्री उपक्रम व आनंददायी शनिवार अंतर्गत विशेष उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.मराठी विषयाचे शिक्षक राधेश्याम शर्मा यांच्या मार्गदर्शनाखाली इयत्ता ८ वीच्या विद्यार्थ्यांनी पाड्यावरचा चहा या धड्याशी संबंधित प्रत्यक्ष चहा बनवण्याचा उपक्रम राबविला. विद्यार्थ्यांनी अत्यंत उत्साहाने सर्व साहित्या स्वताः विकत आनले व सहभाग नोंदवत वारली संस्कृतीतील साधेपणाचा अनुभव घेतला. तयार केलेल्या चहाचा आस्वाद विद्यार्थ्यांसह शिक्षकांनी घेतला.या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना पाठातील आशय प्रत्यक्ष अनुभवातून समजला तसेच कृतीयुक्त शिक्षणातून अध्ययन अधिक आनंददायी झाले. अशा नाविन्यपूर्ण उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशीलता, निरीक्षणशक्ती व संस्कृतीविषयीची जाणीव अधिक दृढ होत असल्याचे मत उपस्थित शिक्षकांनी व्यक्त केले.या उपक्रमासाठी प्रशालेचे मुख्याध्यापिका नूतन पवार शाळेतील शिक्षक दिलीप महाजन, कुलभूषण व्यवहारे, राजेंद्र शिंपी, सलीम आतार ,श्याम खोसरे, श्रीमती किरण पाटील, स्वप्निल गांगुर्डे, गणेश बल्लाळ, रवींद्र ठाकरे, किसनाबाई गोरे आणि सविता कुंटे यांनी सहकार्य केले

## श्रीकृष्ण महाविद्यालयात सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी




**उमरगा (नागसेन कांबळे)** : तालुक्यातील गुंजोटी येथील श्रीकृष्ण महाविद्यालयात सांस्कृतिक विभाग व राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने ज्ञानज्योती व स्त्रीशिक्षणाच्या प्रणेत्या सावित्रीबाई फुले यांची जयंती महाविद्यालयाच्या सभागृहात मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. प्रारंभी माँ जिजाऊ व सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना वंदन करण्यात आले.यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून प्रा.डॉ.आर.एन.निगडे यांनी आपले चिंतन उपस्थितांसमोर ठेवले.यावेळी प्रवर्तन मंचावर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गुलाब राठोड त्याचबरोबर मराठी विभाग प्रमुख डॉ. आशिया चिस्ती, राष्ट्रीय सेवा योजनेच्या महिला समन्वयक डॉ. मल्लमा आंबुसे डॉ. मेगा जोशी या उपस्थित होत्या .डॉ. निगडे यांनी सावित्रीबाई फुले यांच्या संदर्भात माहिती पुरवत असताना ,ज्या कठीण परिस्थितीमध्ये सावित्रीबाई फुले यांनी महिला शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली, अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत १८४८ ला पुण्यात देशातली पहिली मुलींची शाळा काढून त्या काळात एक प्रकारे क्रांती केली. महिला सबलीकरण असो की महिला स्वाभिमान असो की महिला स्वावलंबून असो या सर्वच पातळ्यावर फुले दांपत्यांनी त्या काळामध्ये अतिशय क्रांतिकारक अशा पद्धतीच्या सामाजिक सुधारणा केल्या,नव्हे त्या घडवून आणल्या . त्यात महात्मा फुले यांच्या पत्नी म्हणून सावित्रीबाई फुले यांनी अतिशय मोलाची साथ देऊन स्त्री शिक्षणाच्या हक्का संबंधी सतत अग्रेसर राहिल्या. स्त्रियांचे सर्वंकष प्रश्न घेऊन त्या सतत लढत राहिल्या. आज ज्या महिला वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये यशस्वीपणे कार्यरत आहेत ,आपली जबाबदारी व नेतृत्व अत्यंत चपखलपणे पार पाडत आहेत, त्याचे सर्व श्रेय सावित्रीबाई फुले यांनाच द्यावी लागते सावित्रीबाई फुले याच खऱ्या अर्थाने महिलांच्या तारणहार असून खऱ्या अर्थाने प्रेरणादात्या आहेत .त्यामुळे सावित्रीबाई फुलेंचे स्मरण करणे त्यांच्या कार्याची ओळख करून घेणे हे प्रत्येक महिलेचे आद्यकर्तव्य आहे .अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत आणि स्थितीशील असलेल्या समाजात त्यावेळी बदल घडवून आणणे तितकेसे सोपे नव्हते पण जीवाची पर्वा न करता सावित्रीबाई फुले आपला क्रांतिकारी लढा लढत राहिल्या.परित्यक्ता महिला, अनौरस गर्भधारणा झालेल्या महिला अशा सर्वच महिलांसाठी त्या आयुष्यभर काम करत राहिल्या.समाजाची सेवा करता करताच त्यांना मरण आले,पण आयुष्याच्या अंतिम क्षणापर्यंत त्या आपले सेवाव्रत सोडल्या नाहीत,आपला लढा शेवटच्या टोकापर्यंत लढत राहिल्या यातच त्यांचे मोठेपण दिसून येते.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.डॉ.उमाकांत सूर्यवंशी यांनी केले .तर आभार प्रा.डॉ.डी.पी चव्हाण यांनी मानले राष्ट्रगीतानांतर कार्यक्रमाची सांगता झाली. यावेळी महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

## जिल्हा परिषद प्राथमिक सावित्रीबाई फुले जयंती निमित्त मुली व महिला शिक्षकांचा सन्मान



**छत्रपती संभाजीनगर** : आज दिनांक ३ जानेवारी २०२६ रोजी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा गोपाळपूर केंद्र पिसादेवी तालुका जिल्हा छत्रपती संभाजीनगर येथे ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमांमध्ये काही विद्यार्थिनींनी सावित्रीबाईंची वेशभूषा केली तर काही विद्यार्थ्यांनी भाषण करून सावित्रीबाईंच्या कार्याची महती वर्णन केली. तसेच शाळेतील शिक्षकांनी आपल्या भाषणांमधून विद्यार्थ्यांना सावित्रीबाई सारखेच विचार करण्याचे व महान कार्य करण्याचे आव्हान दिले. त्यानंतर शाळेचे मुख्याध्यापक श्री. लिंगायत सर यांनी शाळेतील सर्व मुली व महिला शिक्षिका व आमच्या स्वयंपाकी तथा मदतनीस यांना गुलाबपुष्प व पेन भेट देऊन त्यांचा सन्मान केला

डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित

मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.



बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (MPW), आरोग्य निरीक्षक, आरोग्य पर्यवेक्षक, स्वच्छता निरीक्षक या पदासाठी आवश्यक असलेला शासनमान्य

Sanitary Health Inspector

सॅनेटरी हेल्थ इन्स्पेक्टर

या कोर्ससाठी प्रवेश चालु आहेत

बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ,पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)

9405109103
8830838903

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार ५ जानेवारी २०२६

# जिल्हा परिषद प्रशाला मुरूम येथे बालिका दिन व किशोरी मेळावा उत्साहात साजरा




**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** आज दिनांक ३ जानेवारी सावित्रीबाई फुले जयंती म्हणजेच बालिका दिवस व किशोरी मेळावा जिल्हा परिषद प्रशाला मुलांची मुरुम येथे उत्साहात साजरा करण्यात आला.स्त्री शिक्षणाची द्वारे ज्या माऊलीने सर्व स्त्री जातीसाठी खुली केली, स्त्रीयांच्या उन्नतीसाठी, समाजसेवेसाठी आपले संपूर्ण आयुष्य खर्च केले, अशा माऊलीची जयंती शाळेत मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक श्री विजयकुमार देशमाने तर प्रमुख पाहुणे म्हणून शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष चाँदपाशा गवंडी व सदस्य कटके ताई हे उपस्थित होते.प्रमुख पाहुणे व अध्यक्ष यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन केले. विविध भारतीय समाजसेविका स्त्री वेशभूषेमध्ये विद्यार्थिनींनी स्त्री शक्तीचा जागर केला . अनेक विद्यार्थ्यांनी सावित्रीबाई फुले यांच्या कार्याचा महिमा सांगितला. शाळेतील शिक्षिका श्रीमती संगित डोकडे यांनी सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावर व मुलींच्या शिक्षणावर प्रकाश टाकला . तर श्री.शिवाजी कवाळे यांनी किशोर वयीन मुलींना आहार आरोग्य व सामाजिक जबाबदारी व खबरदारी इत्यादी विषयी उद्बोधन केले. इ . ५ वी ची विद्यार्थिनी कुमारी श्वेता ढाले हिने मी सावित्री बोलते हे एक पात्री नाटक सादर केले. इयत्ता दहावीच्या मुलींनी सावित्रीमाई फुले यांच्यावर ओवी सादर केली. इयत्ता आठवीतील तनसिरा नदाफ हिने फातिमा शेख यांच्या विषयी माहिती सांगितली. आलिया उडचणे व अल्फला नदाफ या विद्यार्थिनींनी मुलींच्या शिक्षणात येणाऱ्या अडचणी मांडल्या. प्रमुख पाहुणे शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष चांदपाशा गवंडी यांनी बालिका दिनाच्या शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री विजयकुमार देशमाने यांनी आपले अध्यक्षीय समारोपात मुलींनी शिक्षणासाठी येणाऱ्या अडचणीवर मात करून शिक्षणासाठी भक्कमपणे उभे राहावे. स्वतःचे अस्तित्व निर्माण करून आपले आयुष्य किर्तीमान घडवावे,असे प्रतिपादन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इयत्ता आठवीची विद्यार्थिनी कुमारी सृष्टी स्वामी हिने केले तर आभार कु.पूजा कुंभार हीने मांडले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेतील शिक्षक संतोष कडगंचे, विलास कंटेकुरे, मोहन राठोड,गणपत पाटील,राजू पवार, नागनाथ कामशेट्टी,निर्मला परीट इत्यादींनी परिश्रम घेतले.

## माकडाची हुशारी

जंगलातल्या एका तळ्यात
एक दुष्ट मगर राहायची
तहानलेल्या गरीब प्राण्यांना
मिटक्या मारीत खायची

घाबरलेल्या सर्व प्राण्यांची
वाढत गेली भीती
तळ्याकाठी जाण्याची
हिंमत होत नव्हती

आता काय करावे
प्राणी विचार करी
झाडावरील माकडाची
कामी आली हुशारी

माकडाने लढविली मग
एक नामी शक्कल
पाण्यात काटेरी लाकूड टाकून
वापरली अक्कल

नेहमी प्रमाणे मगर
आली जोरात धावून
भक्ष समजून काटेरी लाकूड
खाऊ लागली चाऊन

उतावीळ दुष्ट मगरीचा
रक्ताळला जबडा
हुशार माकडाने
चांगलाच शिकविला धडा



**- रवींद्र चालीकवार**
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो.9011559106

# फुले दाम्पत्याने सुरू केली होती परिवर्तनाची लढाई : संमेलनाध्यक्ष अंजली कुलकर्णी



**कर्जत :** साहित्य संमेलनातून मूल्यांची पेरणी केली जाते. शिक्षिका संमेलनातील उपस्थित शिक्षिका या आद्यशिक्षिका सावित्रीबाई फुले यांच्या वारसदार आहेत. फुले दांपत्याने अनेक महत्त्वपूर्ण ग्रंथ लिहिले, अनिष्ट रुढींवर प्रहार केले. सावित्रीबाई फुले यांनी समाजजागृतीचे व स्त्रीशिक्षणाचे काम केले, तेच कार्य त्यांच्या कवितेच्या माध्यमातून, लेखनातून उमटलेले आहे. शिक्षणाने मनुष्याचे पशुत्व हटते ही धारणा सावित्रीबाई फुले यांची होती. एक पुरुष शिकला तर एक व्यक्ती शिकतो परंतु एक महिला शिकली तर एक कुटुंब, एक समाज शिकतो या भावनेतून महात्मा फुले यांनी सावित्रीबाईंना घडवले होते. तत्कालीन प्रश्नांना वाचा फोडण्याचे काम व परिवर्तनाची लढाई फुले दाम्पत्याने लढली होती, असे प्रतिपादन अखिल भारतीय चौथ्या शिक्षिका साहित्य संमेलनाच्या अध्यक्ष अंजली कुलकर्णी यांनी केले.

भारतातील स्त्रियांच्या जीवनात नवपरिवर्तन करणाऱ्या, स्त्री हक्काच्या प्रणेत्या सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त येथील दादा पाटील महाविद्यालयात येथील मराठी विभागाच्या वतीने अखिल भारतीय चौथ्या शिक्षिका साहित्य संमेलनाचे आयोजन शनिवारी महाविद्यालयाच्या शारदाबाई पवार सभागृहात करण्यात आले होते.

सकाळी ८ ते ९ या कालावधीत कर्जत शहरातून ग्रंथदिंडी व शोभायात्रा काढण्यात आली. या ग्रंथदिंडीत संमेलनाध्यक्ष, संमेलनाचे प्रमुख पाहुणे व निमंत्रित कवयित्री प्राध्यापक व विद्यार्थी सहभागी झाले. याप्रसंगी कन्या विद्यामंदिर, दादा पाटील महाविद्यालयातील विद्यार्थिनींनी वेगवेगळ्या स्त्री समाजसुधारकांच्या वेशभूषा परिधान केलेल्या होत्या. उद्घाटन सत्राकरिता रयत शिक्षण संस्थेच्या उत्तर विभागाचे इन्स्पेक्टर नवनाथ बोडखे, रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य अंबादासजी पिसाळ, बप्पासाहेब धांडे, प्राचार्य डॉ. प्रवीण बडधे, प्राचार्य डॉ. संजय कांबळे, प्राचार्या डॉ. मंजुषा बोबडे, प्राचार्य डॉ.अनिल शितोळे,सुभाषचंद्र तनपुरे, बाळासाहेब साळुंके, प्रकाश धांडे, काकासाहेब वाळुंजकर, तात्यासाहेब ढेरे, निर्मला पाटील आदी उपस्थित होते. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. संजय नगरकर यांनी केले. संमेलनाध्यक्षा कुलकर्णी म्हणाल्या, सावित्रीबाई फुले यांचा वारसा जोपासतच अनेक महिला समाजसुधारक व लेखिका घडल्या. ताराबाई शिंदे, मुक्ता साळवे ते आधुनिक काळातील लक्ष्मीबाई टिळक, बहिणाबाई चौधरी, संजीवनी मराठे, पद्मा गोळे, अनुराधा पोतदार, शांता शेळके, अरुणा ढेरे ते कल्पना दुधाळ या लेखिकांच्या लेखनकार्याचा आढावा त्यांनी याप्रसंगी घेतला.

लक्ष्मीबाई भाऊराव पाटील पुरस्कारप्राप्त सरोजमाई पाटील यांच्या वतीने मोनाताई जगधने यांनी हा पुरस्कार स्वीकारला. आम्ही रयत शिक्षण संस्थेचे राखणदार म्हणून काम करत असल्याचे त्यांनी सांगितले. सरोजमाई यांनी शिक्षिका म्हणून मुंबई येथील झोपडपट्टी सदृश्य परिसरामध्ये महत्त्वपूर्ण काम केले आहे. महात्मा फुले शिक्षण संस्था व रयत शिक्षण संस्थेच्या माध्यमातून शिक्षण कार्यात माईंनी आपली पूर्ण आहुती दिलेली आहे. अरुण कडू पाटील यांच्या हस्ते साहित्यिक, सामाजिक व शैक्षणिक कार्य करणाऱ्या चौदा शिक्षिकांचा व सामाजिक कार्य करणाऱ्या महिलांचा पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला.

जिवंत प्रश्नांचा धांडोळा घेण्याचा प्रयत्न करणार लेखनाची व वाचनाची स्फूर्ती मिळावी याकरिता अशी संमेलने घेण्यामागील उद्देश असतो. शिक्षिका साहित्य संमेलनातून समकालीन जिवंत प्रश्नांचा धांडोळा घेण्याचा प्रयत्न केला जाईल. लक्ष्मीबाई टिळक, बहिणाबाई चौधरी, दुर्गा भागवत, इरावती कर्वे, तारा भवाळकर, कविता महाजन आदि लेखिकांनी स्त्रीकेंद्रित लेखन केलेच परंतु समाजातील वैगुण्यावरही बोट ठेवले, असे उद्घाटन सत्राचे प्रमुख पाहुणे अरुण कडू म्हणाले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार ५ जानेवारी २०२६


## ज्ञानेश्वर गायके यांच्या 'पेरणी'ला सावित्रीबाई जोशी पुरस्कार

**छत्रपती संभाजीनगर :** येथील जीवन विकास ग्रंथालयातर्फे दरवर्षी दिला जाणारा कै. सावित्रीबाई वामनराव जोशी पुरस्कार यावर्षी कन्नड येथील कवी ज्ञानेश्वर गायके यांच्या 'पेरणी' या कवितासंग्रहाला जाहीर झाला आहे. बुधवार दि. ७ जानेवारी रोजी जीवन विकास ग्रंथालयाच्या भा. बा. आर्वीकर सभागृहात सुप्रसिद्ध कवी दासू वैद्य यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी न्या. अंबादासराव जोशी असतील. कार्यक्रमास बहुसंख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन ग्रंथालयाचे कार्यवाह डॉ. राजशेखर बालेकर, सहकार्यवाह नृसिंह कुलकर्णी, कोषाध्यक्ष नितीन कंधारकर आणि कार्यकारिणीने केले आहे.

# गुंता वाढत गेला

झाला होता गुंता
थोडासा
धागा तुटताना
अन् तुटला होता धागा
सर्वांना जोडणारा

मी केला प्रयत्न
तुटलेला धागा जोडण्याचा
अनेकदा

पण गुंता वाढत गेला
धाग्यांच्या गाठीसोबत
मनाचा
नात्याचा
माणसाचा

आता गुंता सोडवतो आहे
सुटता सुटत नसला तरी..



**ज्ञानेश्वर गायके,**
कन्नड

# स. भु. प्रशालेत सावित्रीबाई फुले जयंती साजरी




**छत्रपती संभाजीनगर :** येथील श्री सरस्वती भुवन प्रशालेत क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रशालेचे मुख्याध्यापक विश्वरूप निकुंभ उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हणून प्रशालेचे मा.उपमुख्याध्यापक अनिल देशमुख, पर्यवेक्षक विजय चापाईकर, ज्येष्ठ शिक्षिका नीता पारगावकर आदी मान्यवर उपस्थित होते . सावित्रीबाईंच्या वेशभूषेमध्ये कु. अद्विका मुसळे (5 वी फ) व विद्यार्थी संसद अध्यक्ष कु. तनिषा सूर्यवंशी (७वी फ) उपस्थित होत्या . सावित्रीबाईंच्या सर्व लेकी प्रशालेच्या सर्व शिक्षिका मंचावर उपस्थित होत्या . ५ वी फ च्या विद्यार्थिनींनी तयार केलेल्या फोटो फ्रेम व पुष्प देऊन उपस्थित मान्यवरांचे व सर्व महिला शिक्षकांचे सत्कार केले. मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या भित्तिपत्रकाचे विमोचन करण्यात आले .त्यावेळी ५ वी च्या विद्यार्थिनींनी गीत , भाषण व ५ वी ते ७ वी च्या विद्यार्थिनींनी आपल्या नृत्यातून क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले व महात्मा ज्योतिराव फुले यांच्या संघर्षाचे व यशाचे दर्शन घडविले. ज्येष्ठ शिक्षिका सौ . पारगावकर प्रमुख पाहुणे श्री. देशमुख, अध्यक्ष श्री. निकुंभ सर यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले व विद्यार्थ्यांचे खूप भरभरून कौतुक केले तसेच सर्व शिक्षकांनी ही विद्यार्थ्यांचे कौतुक केले . या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ५ वी फ ची कु. संस्कृती चव्हाण व कु. आराध्या म्हस्के या विद्यार्थिनींनी तर कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन ५ वी चा यशवंत देवरे या विद्यार्थ्याने केले .

## माळीवाड्यात भव्य महारक्तदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद; संध्याकाळपर्यंत ३०० जणांचे रक्तदान




**दौलताबाद (जावेद अहमद) :** मानवी जीवनात दानाचे अनन्यसाधारण महत्त्व असून, रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान मानले जाते. या महान विचारातून जगद्गुरु श्रीमद् रामानंदाचार्य दक्षिणपीठ, नाणीजधाम (महाराष्ट्र) यांच्या यांच्या प्रेरणेने "जीवनदान महाकुंभ २०२६" या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.हा उपक्रम दि. ४ ते १८ जानेवारी २०२६ या कालावधीत सलग १५ दिवस महाराष्ट्र भर चालणार असून, या महाकुंभाद्वारे गरजू व रुग्णांना विनामूल्य रक्त उपलब्ध करून देण्याचा संकल्प संस्थानतर्फे राबविण्यात येत आहे.याच अंतर्गत दि. ४ जानेवारी २०२६ (रविवार) रोजी सकाळी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, माळीवाडा, ता. जि. छत्रपती संभाजीनगर (पश्चिम) येथे भव्य महारक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले.या महान जीवनरक्षक कार्यात मोठ्या संख्येने सहभागी होऊन नागरिकांनी संध्याकाळ पर्यंत ३००, जणांनी रक्तदान केले आहे


दै. महाराष्ट्र जनशक्ती हे महाराष्ट्रातील मराठी भाषेत वाचले जाणारे प्रमुख ई-दैनिक आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात करून व्यवसायवृद्धी करा.

**जाहिरात दर**

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्ण पान (मल्टीकलर) | ५०००/- |
| २. | अर्धे पान (मल्टीकलर) | ३०००/- |
| ३. | पाव पान (मल्टीकलर) | २०००/- |
| ४. | शुभेच्छा जाहिरात | ६००/- |